REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख ६ आक्टोबर, १९४८ अंक ४०


## दि न्यू सिटिझन बँक

### ऑफ इंडिया, लि.

हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

एकूण खेळतें भांडवल : ३,५०,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : १२,००,००० रु. वर

★ बँक स्ट्रीटवर ★

३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत

**स्थानिक शाखा :** १ दादर, २ गिरगांव, ३ सँटरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शींव, ७ विलेपार्ले.

**इतर शाखा :** ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ ऋडाक टाऊन ( सी. पी. ), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव ( पंजाब ), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहूपुरी, ४२ सिन्नर, ४३ सिताबर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर ( पुणें ), ४६ शहापूर ( बेळगांव ) ४७ नामपूर ( नाशिक ).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

भागीदारांची संख्या २,२०० वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
( बुधवार चौक )

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.

## पुणें सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना—१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. ४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, पुणें शहर.

शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलेज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा व मंचर

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

द. दि. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें






माणिक नं. 20
कपड्याकरितां उत्तम साबण
माणिक सोप वर्क्स
...कराड, (सातारा)...

मशिनरी खरेदीचा प्रश्न

कोणतीहि मशिनरी खरेदिण्यापूर्वी आमचा सल्ला घ्या.
आमचें सहकार्य आपल्या नेहमींच फायद्याचें ठरेल.
लेथ्स, ड्रिलिंग मशिन्स, ऑइल एंजिन्स, वगैरेचे विक्रेते.
बुधवार चौक.
केळकर बंधू, पुणें २.

## विविध माहिती

**हिंदुस्थान-ऑस्ट्रेलिआ व्यापार**—१९४७-४८ ह्या सालीं हिंदुस्थान व ऑस्ट्रेलिआ ह्या देशांतील व्यापारानें नवा उच्चांक गांठला. ऑस्ट्रेलिआंतून हिंदुस्थानला ६८,१६,००,००० रुपये किंमतीचा माल आयात करण्यांत आला. ही आयात युद्धापूर्वीच्या कालापेक्षां तेरा पटीनें अधिक आहे. हिंदुस्थाननें ऑस्ट्रेलिआला २८,४१,६०,००० रुपये किंमतीचा माल निर्यात केला. १९३८-३९ सालीं ह्याच्या एक अष्टमांश निर्यात झाली होती. ऑस्ट्रेलिआंतून गहूं, इतर धान्य व लोंकर आयात झाली. उलट हिंदुस्थाननें ताग व तन्निर्मित वस्तू निर्यात केल्या.

**अन्न म्हणून माशांचा उपयोग**—हिंदुस्थानच्या अन्न निर्माण करण्याच्या कार्यक्रमांत मासे पकडण्याच्या धंद्याला अधिक पैसा व मनुष्यबळ पुरविलें पाहिजे, असें हिंदुस्थानच्या अन्नमंड्यांनीं नुकतेंच बोलून दाखविलें. जपानी लोक अन्नाचा तुटवडा मासे खाऊन भरून काढतात. त्याचप्रमाणें हिंदुस्थाननेंही करणें जरूर आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें. जपानमध्यें दरवर्षी दरमाणशीं १११ पौंड मासे पकडले जातात. कॅनडांत १०९ पौंड आणि इंग्लंडमध्यें ४९ पौंड, तर हिंदुस्थान, ब्रम्हदेश, इराण मिळून फक्त पांच पौंड मासे पकडले जातात. हिंदुस्थानच्या ३,२०० मैल समुद्र किनाऱ्याच्या आश्रयानें अद्याप फक्त ५ ते ६ टक्के मच्छीमारीच्या समुद्राचा उपयोग केला जातो. ह्या पेक्षां कितीतरी अधिक पटीनें समुद्र किनाऱ्याचा उपयोग करता येण्यासारखा आहे. ह्याशिवाय देशांतर्गत सरोवरें व तळीं ह्यांचा उपयोग करतां येईल तो वेगळाच. आज हिंदुस्थानांत दर माणशीं दरदिवशीं, जपानी लोकांच्या मानानें फक्त एक अठ्ठाविसांश मासे खाण्यांत येतात.

**बंगलोरचा टेलिफोनचा कारखाना**—हिंदुस्थान सरकारचे दळणवळण मंत्री श्री. रफी अहमद किदवाई ता. १२ ऑक्टोबरला इंडिअन टेलिफोन इंडस्ट्रीज ह्या कारखान्याच्या इमारतीच्या पायाचा दगड बसविणार आहेत. हा कारखाना बंगलोर पासून ५ मैलांवर कृष्णराजपुरम येथें उभारण्यांत येणार आहे. सध्या काम तात्पुरत्य वर्कशॉप्समधून सुरू करण्यांत येणार आहे. नोव्हेंबरच्या सुमाराला टेलिफोन्स जुळविण्याचे काम सुरू होईल असें वाटतें.

**तयार घरांचें तयार गांव**—जिनोआ ह्या बोटीनें ६०० इटालिअन लोक दक्षिण अमेरिकेंतील अर्जेटायनांत स्थायिक होण्यासाठी रवाना झाले. त्यांनीं आपल्याबरोबर तयार घरें घेतलीं असून इच्छित स्थळीं पोंचल्यावर ते आपलें एक गांवच हीं घरें उभारून वसवणार आहेत. घरांशिवाय सुट्या कारखान्यांची यंत्रसामुग्रीहि त्यांनीं बरोबर घेतली आहे.

**काश्मीरसाठी धान्य**—येत्या हिवाळ्यांत काश्मीरला धान्याचा तुटवडा पडूं नये म्हणून हिंदुस्थान सरकार जरूर ती व्यवस्था करीत आहे. १९४८ सालीं काश्मीरसाठी १७,०००टन अन्नधान्य देण्याचें कबूल करण्यांत आलें होतें. त्यापैकीं ११,५०० टन अन्नधान्य आतांपर्यंत देण्यांत आलें आहे. उरलेलें ५,५०० टन धान्य लवकरच पाठविण्यांत येणार आहे. काश्मीरमधील अन्नाचा प्रश्न सोडविण्यास मदत करण्यासाठी हिंदुस्थान सरकारचा एक अधिकारीहि काश्मीरला जाणार आहे.

**मार्शल योजनेंतील ब्रिटनला दिलेली मदत**—गेल्या एप्रिलपासून मार्शल योजनेप्रमाणें ब्रिटनला ४० कोट, ९८ हजार, २०० डॉलर्स मदतीदाखल मंजूर करण्यांत आले.

**ब्रिटिश राजाची ऑस्ट्रेलियास भेट**—ग्रेटब्रिटनचे राजे, राणी व राजकन्या मार्गारेट हे न्यूझिलंड व ऑस्ट्रेलिया ह्या वसाहतींस भेट देण्यासाठी पॅडिंगटन येथून २७ जानेवारी, १९४९ रोजीं सकाळीं १० वाजतां निघतील. व्हॅनगार्ड बोट डेव्हनपोर्ट मधून निघेल, ती वेलिंग्टन येथें २८ फेब्रुवारी रोजीं पोंचेल. न्यूझिलंडमधून ३१ मार्च रोजीं ही मंडळी निघून ४ एप्रिल रोजीं सिडन येथें दाखल होईल. ११ जून रोजीं ते ऑस्ट्रेलिया सोडतील व केपटाऊन मार्गें इंग्लंडकडे परततील.

**अमेरिकन कुटुंबाची प्राप्ति**—अमेरिकन माणसाची सरासरी वार्षिक प्राप्ती आतां ४,५०० रुपयांवर गेली आहे. न्यूयॉर्कमधील चार माणसांच्या कुटुंबास सरासरीनें २५,००० रु. मिळतात. नेव्हडामधील कुटुंबाचें उत्पन्न त्याहूनहि थोडें ज्यास्त असतें. तथापि, महागाईहि वाढली आहे आणि राहाणीचा दर्जा कायम ठेवणें अमेरिकन लोकांना कठीण जात आहे!

**अमेरिकेंतील वाढत्या किंमती**—अमेरिकेंतील वाढत्या किंमतीमुळें अमेरिकन नागरिकांची हॉटेलांत जाऊन जेवण घेण्याची प्रवृत्ती कमी होत चालली आहे. बरेचसे अमेरिकन लोक आतां पुन्हां घरीं जेऊं लागले आहेत. घरीं पाहुणा आला तर त्याला हॉटेलांत नेऊन जेवण देण्याची अमेरिकेंत फार प्रथा आहे. पत्नीला घेऊन आठवड्यांतून एकदा तरी बाहेर जेवण्याची अमेरिकनांना फार हौस आहे. पण हॉटेलांतील महागाईमुळें आतां ह्या दोन्ही प्रथा मोडत चालल्या आहेत.

**रशियाजवळ अणुबाँब आहे?**—"रशिआंतील २६ अणुशास्त्रज्ञांपैकीं बहुतेकांना मी भेटलों आहे. त्यावरून मला असें वाटतें कीं, रशिआजवळ अणुबाँबचें गुपित आहे. अणुशक्ती औद्योगिक उत्पादनासाठी वापरण्यासाठी रशिया शिकस्तीचे प्रयत्न करीत आहे. परंतु वेळ आल्यास अणुशक्तीचा उपयोग करून बाँब करण्याचें सामर्थ्य रशिआ थोड्याच काळांत पैदा करू शकेल." असे उद्गार कँटरबरीचे आर्चबिशप ह्यूलेट जॉन्सन ह्यांनीं लंडनमधील एका जाहीर भाषणांत काढले.

**हिंदी वानरांची अमेरिकेकडे निर्गत**—अमेरिकेंत हिंदी वानरांस बरीच मागणी आहे. गेल्या आठवड्यांत शेकडो हिंदी वानरें अमेरिकेस धाडण्यांत आलीं. वानरांच्या मोबदल्यांत आपणांस दुर्मिळ असे डॉलर मिळत आहेत.

**निर्वासितांना जमीन**—पूर्व पंजाबांतून सिंधमध्यें निर्वासित म्हणून मेलेल्या प्रत्येक कुटुंबास सिंध सरकार १२ एकर जमीन देणार आहे.

-सर्व प्रांतांतील-
सुती-गरम-रेशमी
-खादीचें माहेरघर-
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ
पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. ६ आक्टोबर १९४८





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आ.


## घसारा फंडाचें रिझर्व्ह फंडांत रूपांतर

### कामगारांना नफ्यांत भागीदारी देण्यापूर्वीची योजना

कारखाने, यंत्रसामुग्री, इमारती, इत्यादि मालमत्ता झीज पावत असते व तिची उत्पादक शक्ति व किंमत कमी कमी होत जाते. कालांतरानें तिची उत्पादक शक्ति नाहींशी होऊन किंमतहि शून्यावर येते. कंपन्यांच्या ताळेबंदांतील ज़िंदगी त्याप्रमाणें कमी करावी लागते, आणि त्यासाठी घसारा काढण्यांत येतो. जिंदगींतून घसारा वजा केला जातो किंवा देणें बाजूस घसारा फंड निर्माण करण्यांत येतो व त्यांत सालोसाल भर टाकण्यांत येते. अशा रीतीनें घसारा फंड मोठे करून कंपन्यांची परिस्थिति भक्कम राखण्यांत येते. घसारा काढणें ही व्यवहाराचे दृष्टीनें आवश्यक बाब असल्याकारणानें, इनकम टॅक्स तिचेवर आकारण्यांत येत नाहींत; निवळ नफा काढण्यापूर्वी घसाऱ्याची तरतूद करण्यांत येते. कांहीं कंपन्यांना घसारा काढणें परवडत नाहीं, तर कांहीं किफायतशीर कंपन्या शक्य तेवढा मोठा घसारा काढून नफा डोळ्यांवर येऊं देत नाहींत. कांहीं वर्षांनीं असें आढळून येतें, कीं मालमत्ता व यंत्रसामुग्री सुस्थितींत असूनहि त्यांची किंमत ताळेबंदांतून लिहून टाकण्यांत आलेली आहे, किंवा घसारा फंडाची रक्कम मूळ मालमत्तेच्या व यंत्रसामुग्रीच्याहि ज्यास्त भरत आहे. कधींकधीं मालमत्तेची किंमत वास्तविक वाढत असते, परंतु कंपनी इकडे घसारा काढून किंमत कमी कमी दाखवीत जाते. अशा तऱ्हेचें नशीब जितक्या कंपन्यांच्या वाट्यास येईल, तेवढें उत्तमच. भागीदारांच्या सुरक्षितपणाचे व अंतिम हिताचे दृष्टीनें तें श्रेयस्करच ठरतें. परंतु चांगल्या गोष्टीसहि कांहीं मर्यादा असतेच, आणि चालू उत्पन्नाचा विनियोग पुढील तरतुदीसाठी जरूरीचे पेक्षा किती अधिक करावयाचा, हेंहि पाहिलें पाहिजे. उलटपक्षीं, मालमत्ता झिजून किंवा अन्य कारणानें नुकसान पावते व त्या नुकसानीची वाजवी तरतूद आगाऊ करून ठेवली नाहीं तर नवीं यंत्रें किंवा इमारत घेण्यास नवें भांडवल उभारावें लागतें आणि तें उभारणें शक्य झालें नाहीं तर धंदा बंद करण्याची पाळी येते.

विचारपूर्वक बाजूस काढलेला रिझर्व्ह फंड पुनः नफा-तोटा पत्रकांत जमा करून त्यामुळें दिसणाऱ्या नफ्याचा विनियोग तोटा भरून काढण्याकडे व डिव्हिडंड वाटण्याकडे करणें कितपत श्रेयस्कर होईल? असें करणें कायदेशीर असलें तरी कंपन्यांच्या हिशेब पद्धतीच्या मूल तत्त्वास तें धरून होणार नाहीं. परंतु कामगारांना नफ्यांत भागिदारी देण्याचें तत्व आतां हिंदुस्थानांत अमलांत येऊं लागलें आहे आणि कंपन्यांच्या डिव्हिडंडवर नियंत्रण क्रमप्राप्तच होणार आहे. वसूल भांडवल आणि रिझर्व्ह ह्याच्या बेरजेच्या रकमेवर ६% नफा, हा वाजवी नफा समजला जाणार आहे आणि रिझर्व्हमध्यें घसारा फंड धरण्यांत येणार नाहीं. ज्या नफ्यावर कर देण्यांत आला आहे, अशा नफ्यांतून बाजूस काढलेले रिझर्व्हच फक्त ‘ धंद्यांत गुंतलेलें भांडवल ’ ह्या सदरांत येऊन ६% नफ्यास पात्र राहील.

सहाजीकच अशा रिझर्व्हची रक्कम वाढविण्याचा कंपन्यांचा प्रयत्न चालू झाला आहे. गुप्त रिझर्व्ह राखण्यांत आतां पूर्वीइतका फायदा उरणार नाहीं. कलकत्त्याच्या पोर्ट शिपिंग कंपनी लि. च्या ताळेबंदांतील घसारा फंडापैकी १८½ लक्ष रुपये तिनें नफा–तोटा खातीं जमा करून त्यामुळें निर्माण होणाऱ्या वाढाव्यांतून १७ लक्ष, ९० हजार रुपयांचा विनियोग वेगवेगळे रिझर्व्ह फंड वाढविण्याकडे केला आहे. नफ्यांत कामगारांची भागीदारी सुरू होण्यापूर्वीच आपली ताळेबंदी परिस्थिति भागीदारांच्या हितास पोषक करून ठेवण्याचा हेतु कामगारांशीं ह्या प्रश्नावर पुढें वांधा टाळणें हाच आहे. शिलकी घसारा फंडांतील तरतूद इतर फंडांकडे वर्ग करून पुनः मोठ्या प्रमाणावर घसारा काढण्याची शक्यता पोर्ट शिपिंग कंपनीनें करून ठेवली आहे आणि नफा ठरविण्यापूर्वी हा घसारा बाजूस काढावयाचा आहे. त्यास कामगारांना विरोध करतां येणार नाहीं. पुढें येणाऱ्या प्रश्नांस तोंड देण्याच्या पूर्व तयारीचा हा प्रयत्न उद्बोधक आहे.

## सरकारी खर्चांत बचत करा

### इं. मॉ. फंडाची सूचना

इंटरनॅशनल मॉनेटरी फंडाचा वार्षिक अहवाल त्या संस्थेच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सना नुकताच सादर करण्यांत आला. युरोपांतील व आशियांतील जे देश चलनवृद्धीच्या संकटांत सांपडले आहेत त्यांचा उल्लेख अहवालांत करण्यांत आला आहे. चलनवृद्धीवर उपाय म्हणून अहवालांत तीन उपाय सुचविण्यांत आले आहेत: ( १ )सरकारी खर्चांत बचत करणें,( २ )जबर कर बसविण्याचें धोरण चालू ठेवणें आणि ( ३ )सरकारी अंदाजपत्रकें शिलकीचीं करण्याचा प्रयत्न करणें. कांहीं देशांतून युद्धकालीन वांटप व नियंत्रणपद्धती तशीच चालू ठेवण्यांत आल्यामुळें उत्पादन घटलें आहे, असें नमूद करण्यांत आलें आहे. जगांतील पश्चिम गोलार्धांत अमेरिकेनें अधिक माल निर्यात केला तरच जगांतील डॉलर्सचा तुटवडा भरून येईल. पूर्वेकडील देशांसंबंधीं लिहितांना अहवाल म्हणतो, “ऑस्ट्रेलिआ, न्यूझीलंड व दक्षिण अफ्रिका ह्या देशांतून युद्धाकालीन उत्पादनाचा विकास १९४७ सालीं तसाच चालू राहिला. मध्यपूर्व व हिंदुस्थानांत मात्र औद्योगिक भरभराट यंत्रसामुग्रीच्या व इतर सोयींच्या अभावीं नीटशी होऊं शकली नाहीं. अतिपूर्वेकडील देशांतून राजकीय झगडा व युद्ध ह्यामुळें आर्थिक प्रगतीला अडथळा आला. मध्यपूर्वेंत व हिंदुस्थानांत दोस्त राष्ट्रांनीं युद्धावर केलेल्या खर्चामुळें फार मोठा चलन विस्तार झाला. त्यामुळें किंमती भरमसाट वाढल्या तरी त्या मानानें उत्पादनाच्या खर्चांत मात्र वाढ झाली नाहीं. हुंडणावळीबद्दल अहवालांत असें म्हटलें आहे कीं, एखाद्या देशाचा हुंडणावळीचा दर त्याच्या निर्यात व्यापाराला जोंपर्यंत बाधक होत नाहीं, तोंपर्यंत तो बदलण्याची आवश्यकता भासण्याचें कारण नाहीं. तथापि, कांहीं देशांच्या हुंडणावळीच्या दरामुळें त्यांची निर्यात कमी होत असल्याचीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. त्यामुळें एकमेकांत बदला करता येण्यासारखें आंतराष्ट्रीय चलन मिळणें अवघड होत चाललें आहे.

## पाकिस्तानच्या नव्या चलनी नोटा

**मध्यवर्ती बँकेच्या नोटांवर सरकारच्या अर्थमंत्र्याची सही**

१ मार्च, १९४८ पासून पाकिस्ताननें स्वतःच्या स्वतंत्र नोटा प्रसृत करण्यास प्रारंभ केला आणि रिझर्व्ह बँकेच्या नोटांवर "गव्हर्मेंट ऑफ पाकिस्तान" असा शिक्का मारून त्या नोटांस पाकिस्तानी बनविलें. आतां, १ ऑक्टोबर, १९४८ पासून स्टेट बँक ऑफ पाकिस्ताननें स्वतंत्र नव्या नोटा काढल्या आहेत. परंतु १ मार्च, १९४८ ते ३० सप्टेंबर, १९४८ ह्या मुदतींत काढलेल्या नोटाहि चालूच रहातील. हिंदी रिझर्व्ह बँकेच्या नोटेवर बँकेच्या गव्हर्नरची सही असते, परंतु पाकिस्तानच्या मध्यवर्ती बँकेच्या नोटेवर पाकिस्तानच्या अर्थमंत्र्याची उर्दूंत सही आहे. नोटेवर "गव्हर्मेंट ऑफ पाकिस्तान" अशी इंग्रजींत व "हुकुमत-इ-पाकिस्तान" असे उर्दू शब्द नोटांवर छापलेले आहेत. स्टेट बँक ऑफ पाकिस्ताननें नोटा काढलेल्या असतांना, पाकिस्तानी सरकारचें त्यांवर वास्तविक नांव असण्याचें कारण नाहीं. परंतु तें आहे, ह्याचा अर्थ नोटांची जबाबदारी सरकारनें घेतली, असा होतो.

### महागाईचा कळस

अन्नधान्य व कोळसा ह्यांची किंमत वाढल्यामुळें ऑगस्टमधील रहाणीच्या खर्चाचें मान जास्तच वाढून कळसास पोचलें. महागाईबद्दल एकसारखी तक्रार चालू असतांना, चांगल्या तांदुळाचा खप वाढलेलाच दिसतो. धोतरें व साड्या ह्यांच्या किंमती थोड्या उतरल्या. नवीन अन्नधान्य नियंत्रणामुळें व कापड नियंत्रणामुळें रहाणीचा खर्च कांहीं काळानें उतरेल अशी अपेक्षा आहे.

## चलनवाढीवर सरकारी उपाययोजना

**खर्चांत कपात, उत्पादनांत वाढ, बचतीस प्रोत्साहन.**

हिंदुस्थानांतील चलनवाढ व त्यामुळें निर्माण झालेली परिस्थिति, ह्यांवरील आपली उपाययोजना सरकारनें जाहीर केली आहे. त्यांतील महत्त्वाच्या बाबी खालीलप्रमाणें आहेत:—

(१) मध्यवर्ती व प्रांतिक खर्चांत काटकसर करून अंदाजपत्रकें वाढाव्याचीं करणें.

(२) ज्या योजनांवरील खर्च उत्पादक ठरणार नाहीं, त्या योजना बंद करणें किंवा पुढें ढकलणें.

(३) दारूबंदी करणें व जमीनदारी नष्ट करणें ह्याबाबत प्रांतिक सरकारांच्या योजना आहेत त्यांस मध्यवर्ती सरकारनें मदत न देणें.

(४) प्रांतिक सरकारांनीं शेतांच्या उत्पन्नावर इनकमटॅक्स बसविणें.

(५) वारसा कर बिलाचें कायद्यांत सत्वर रूपांतर करणें.

(६) साखरेचा भाव उतरविणें; रॉकेल, लोखंड, पोलाद, सिमेंट इत्यादींचें वाटप सुधारणें.

(७) पैसा बचत करण्यास प्रोत्साहन देणाऱ्या योजना जोरानें हातीं घेणें.

(८) कंपन्यांना ६% पेक्षा ज्यास्त डिव्हिडंड देण्यास बंदी करणें. त्यांची गेल्या दोन वर्षांतील डिव्हिडंडची सरासरी ६% पेक्षा कमी असेल, तर त्या सरासरीचे वर डिव्हिडंड जाता कामा नये.

(९) जादा नफ्यावरील कराच्या ठेवी परत करण्याची मुदत ३ वर्षे लांबविणें.

# कंपनीचा नफा, जिंदगी व डायरेक्टरांचा मेहनताना

लिमिटेड कंपन्यांचें धोरण आखण्याचें काम डायरेक्टर करीत असतात आणि डायरेक्टरांना त्याबद्दल मेहनताना मिळतो. ही रक्कम नेहमीच प्रमाणबद्ध असते असें नाहीं. ज्यास्त मेहनतान्यामुळें डायरेक्टरांचें काम अधिक चांगलें होऊन कंपनीचा नफा वाढतो, असेंच कांहीं म्हणतां येणार नाहीं. डायरेक्टरांची फी किती असावी, हा प्रश्न सहाजीकच निर्माण होतो. डायरेक्टरांपैकी सर्वांना सभेस हजर रहाण्याबद्दल सारखीच फी मिळते. त्या सर्वांचा सल्ला एकजात सारख्या मोलाचा असतो, असेंहि म्हणतां येणार नाहीं. कंपनीचा व्याप मोठा, खेळतें भांडवल व ठोक नफा मोठा, त्या मानानें डायरेक्टरांचा मेहनताना अधिक असावा, असें कोणी सुचवितील; परंतु तेंहि बरोबर होणार नाहीं. प्रत्येक कंपनीच्या विशिष्ट परिस्थितीवर सर्व कांहीं अवलंबून राहील. खालील तक्त्यांत १२ प्रमुख ब्रिटिश कंपन्यांचा तपशील दिला आहे, तो उद्‌बोधक होईल.

**डायरेक्टर बोर्डांचा मेहनताना**

| कंपनी | डायरेक्टरांचा मेहनताना | डायरेक्टरांची संख्या | प्रत्येक डायरेक्टरास मिळणारी सरासरी रक्कम | दर हजार पौंड जिनगीशीं बोर्डांच्या मेहनतान्याचें प्रमाण | दर हजार पौंड ठोक नफ्याशीं बोर्डांच्या मेहनतान्याचें प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | (पौंड) | | (पौंड) | (पौंड) | (पौंड) |
| डनलॉप | १,१९,२५१ | १० | १२,००० | ५·२२ | ३२·८५ |
| इं. के. इंडस्ट्रीज | ३,०६,२२५ | २२ | १३,९२० | १·९३ | १२·१५ |
| व्हाइटहेड आ. स्टी. | ६१,९९३ | ५ | १२,४०० | १५·८० | १५८·४० |
| जे. लेऑन्स | २,००,७७९ | १८ | ११,१७० | ९·१९ | ८२·४० |
| लिव्हर ब्रदर्स | २,६०,१९५ | २४ | १०,८५० | १·३७ | ९·१४ |
| बूटस | १,२२,७७७ | १२ | १०,२३० | १४·२६ | ४२·७० |
| बीचॅम ग्रुप | ८९,७५५ | १२ | ७,४८० | ४·०१ | ३७·८० |
| कोर्टाल्डस | १,४८,६४० | १७ | ८,७४० | २·४८ | २०·५५ |
| आय. आर. टॉमस अँड बाल्डविन्स | ७३,३९५ | १० | ७,३३९ | २·०८ | ११·२८ |
| ब्रि. इ. केबल्स | ६५,८७२ | ११ | ५,९९० | २·०३ | १४·७४ |
| ए. बी. पिक्चर्स | १९,००० | ५ | ३,२०० | ८·७१ | ९३·८० |
| पाय् | २०,५७० | ७ | २,९४० | ९·८२ | ७२·८० |
| एकूण | १,२८६,३३९ | १२३ | १०,४४० | ६·४२ | ४९·०५ |

## सहकारी बँकांचे अहवाल

### दि सारस्वत को. बँक लि., मुंबई

वरील आदर्श सहकारी बँकेचा रिपोर्ट व ताळेबंद सहकारी कार्यकर्त्यांनीं जरूर वाचून अभ्यासावा. ताळेबंदाची मांडणी, रिपोर्टांचा तपशील, ह्याप्रमाणेंच बँकेचा प्रगतिपर कारभार, किफायतशीर व्यवहार, मजबुती वाढविण्याचें धोरण, इत्यादि सर्व बाबतींत सारस्वत बँक अनुकरणीय आहे. उदाहरणार्थ, बँकेकडील येणें २३ लक्ष, ३७ हजार रु. कर्जांपैकी फक्त सुमारें ७० हजारांचीं कर्जें जामिनकीवर असून बाकी सर्व कर्जें घरें, माल, मशिनरी, बँकांचे व कंपन्यांचे शेअर्स, विमा पॉलिसी, इत्यादींच्या तारणावर आहेत. वसुलीस पात्र झालेल्या कर्जांपैकी ९८% रक्कम वसूल झाली. सरकारी व इतर रोख्यांत गुंतविलेली रक्कम पहातां, रोख्यांची बाजारी किंमत हिशेबांतील किंमतीपेक्षा १,१०,०६२ रुपयांनीं अधिक आहे. व्यवस्था खर्च वाढूनहि, निवळ नफाहि ३३% वाढला आहे. नव्या सहकारी कायद्यामुळें बँकेस डिव्हिडंडचा दर उतरवून ६¼% करावा लागला आहे. २,६०७ सभासद; ४,११,०५० रु. वसूल भांडवल; २,३४,३९७ रु. रिझर्व्ह व इतर फंड; ८२,२९,७२९ रु. ठेवी; २३,३७,२८७ रु. कर्जें; ५८,२०,०५८ रु. इन्व्हेस्टमेंटस; ८९,८१,५१८ रु. खेळतें भांडवल; ४५,३०२ रु. निवळ नफा असे तिच्या व्यवहाराचे आकडे आहेत. सहकारी बँक आपल्या सभासदांच्या उन्नतीसाठी त्यांची कोणत्या प्रकारें सेवा करूं शकते, हें सारस्वत बँक चांगल्या तऱ्हेनें दाखवून देत आहे. बँकेच्या डायरेक्टर बोर्डापैकी आठ सभासद पदवीधर आहेत आणि त्यांपैकी चार डायरेक्टर बी. कॉम्. आहेत; त्यांत मिसेस डी. एम. सबनीस ह्यांचाहि समावेश होतो. ( चेअरमनः श्री. व्ही. पी. वर्दे, बी. कॉम; सेक्रेटरीः श्री. एस. व्ही संझगिरी, बी. कॉम. )

---

### अर्बन को. बँक लि., सांगली

अहवालाचे वर्षीं, फेब्रुवारीमध्यें सांगली येथें झालेल्या दंगलींत व जाळपोळींत बऱ्याच ठेवीदारांची मालमत्ता नष्ट झाली व त्यांना ठेवी परत द्याव्या लागल्या, परंतु आतां त्या पूर्ववत् झाल्या आहेत. कर्जदारांचेंहि आपत्तींत नुकसान झाल्यामुळें थकबाकी ५८ हजारांनीं वाढली. व्यवस्थापक मंडळ शक्यतों सहानुभूतीनें परंतु बँकेच्या हिताबद्दल जागरूक राहून वसुलीची सर्व प्रकारें दक्षता घेत आहे. बँकेनें सहकारी तत्त्वास अनुसरून नुकसान झालेल्या सभासदांना बँकेच्या पद्धतीन मदत करणेचे हेतूनें २ वर्षें मुदतीनें ३% व्याजानें १½ लक्ष रु. रक्कम मंजूर केली आहे. प्रत्येक सभासदास ज्यास्तींत जास्त ५ हजार रु. मिळूं शकतील, त्यामुळें जास्तींत जास्त सभासदांना त्याचा फायदा घेतां येईल. मंजूर केलेल्या रकमेमुळें आपद्ग्रस्त सभासदांना आपला व्यापार-धंदा व दुकानें उभारतां आलीं. बँकेचें वसूल भांडवल १,०१,८६० रु. असून तिचे रिझर्व व इतर फंड ३७८५० रुपयांचे आहेत. ठेवी १०½ लक्ष रुपयांच्या असून येणें कर्ज ७ लक्ष, ६३ हजारांचें आहे. बँकेस २२,२३७ रु. निवळ नफा झाला. ६¼ डिव्हिडंडला ६,३७५ रु. लागले आणि रिझर्व व इतर फंडांत सुमारें १४½ हजारांची भर पडली. ( चेअरमनः श्री. ग. कों. गोडबोले, बी. ए., एलएल. बी.; व्यवस्थापकः श्री. ल. य. लागू, बी. ए., एलएल. बी. )

---

### सन्मित्र को. बँक लि.

वरील बँकेच्या शेअर भांडवलांत ११,२९६ रुपयांची भर पडून तें ४२,१३२ रु. झालें. ठेवींहि वाढून त्या १ लक्ष, ६२ हजार रुपयांवर गेल्या आहेत. गंगाजळींत ८,१८५ रु. आहेत. एकूण ताळेबंद २,२७,७०२ रुपयांचा आहे. बँकेनें १ लक्ष, १ हजार रुपयांचीं कर्जें दिलेलीं आहेत. व तिच्या इन्व्हेस्टमेंट खातीं १,०२,३३२ रु. आहेत. बँकेस ४,०६१ रु. निवळ नफा झाला. ५% डिव्हिडंडला सुमारें २ हजार रु. लागले. गेल्या २-३ वर्षांत थकबाकी वसूल करण्याकडे बोर्डानें विशेष लक्ष दिलें. हल्ली थकबाकीचें प्रमाण ८¾% चे आंत आहे. ह्या वर्षीचे ऑडिटर श्री. जी. एस. अभ्यंकर ह्यांनीं बँकेची प्रगति पाहून 'अ' वर्गाची शिफारस केली आहे. ( चेअरमनः श्री. र. के. मांडुस्कर, बी. कॉम., एलएल. बी.; मॅनेजिंग डायरेक्टरः श्री. वि. भा. भोळे )

---

### दि अर्बन को. बँक लि., इस्लामपूर

वरील बँकेचें शेअरभांडवल व ठेवी ह्यांत वाढ होऊन तिचें खेळतें भांडवल आतां १¾ लक्ष रुपये झालें आहे व उलाढालीचा आकडा १५⅓ लक्ष रुपयांवर गेला आहे. अन्नधान्य वस्तूंवरील विनियंत्रणामुळें खुल्या व्यापाराची थोडी वाढ झाली व त्यामुळें माल तारणावरील व्यवहार सुधारला. नफ्यांतहि वाढ होऊन तो १,९२८ रु. झाला. ४% डिव्हिडंडला ८९८ रु. लागले. ( चेअरमनः श्री. गो. ल. फडणीस, बी. ए. एलएल. बी.; सेक्रेटरी: श्री. के. डी. बोरकर. )

---

### जवळे विविध कार्यकारी सहकारी सोसायटी अ. लि.

वरील सोसायटी तिच्या स्थापनेपासून ब वर्गांत आहे. नियंत्रण परिस्थितींत सोसायटीनें जवळे गांवाकरितां (ता. सांगोले, सोलापूर) वांटपाचीं कामें अत्यंत समाधानकारक केलीं. आसपासच्या दहा खेड्यांकरितां कापड वाटपाचें कामहि सोसायटीस देण्यांत आलें होतें. सध्या सोसायटीमार्फत आसपासच्या चार गांवांकरितां स्वस्त धान्याचें दुकान चालविलें जात आहे. ( चेअरमनः श्री. बाबासाहेब आ. पाटील ऑ. सेक्रेटरीः श्री. आप्पासाहेब ब. पाटील).

---

### शेअर्स वाढाव्यानें विकण्यास भागीदारांची नामंजुरी

पुणें सें. को. बँकेच्या भागांचें भांडवल वाढवितांना, नवे शेअर्स प्रत्येक शेअरचे पोटीं २५ रुपये पर्यंत वाढावा घेऊन विकण्याचा अधिकार डायरेक्टर बोर्डास मिळावा, अशी तिच्या वार्षिक सभेकडे मागणी करण्यांत आली. परंतु, भागीदारांनीं ह्या वाढाव्यास मंजुरी दिली नाहीं.

## Bombay Provincial Co-operative Institute.

Applications for the post of **Co-operative Training Inspectors** are invited from persons who are at least Matriculates with experience of the working of Co-operative Movement. Persons with higher educational qualifications, possessing experience in propaganda and educational work of the Co-operative Movement will be preferred. The appointments will be on a scale of salary 75-5/2-90 E. B. 130 plus such dearness allowance as may be sanctioned from time to time. Applications giving full details regarding age, educational qualifications, practical experience in Co-operation etc., should be sent so as to reach the Honorary Secretary, 9, Bakehouse Lane, Fort, Bombay, on or before the 10th October 1948.

नवीन पुष्कळ निघाले, तरी
तुळजाराम मोदी,
सातारा
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक
लि.
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. | १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. | ७,१२,७६० |
| खेळतें भांडवल | रु. | ७०,००,००० |

मुंबई शाखा:—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १
श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.
बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
"बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे."
श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एल्एल्. बी., मॅनेजर
श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर

दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी, लि.
हैद्राबाद संस्थानांत महत्त्वाचे ठिकाणीं, प्रतिनिधी नेमणें आहेत.
ठराविक कामाची हमी देऊं शकणाऱ्या वजनदार गृहस्थांनीं भेटावें अथवा लिहावें.

| | | |
|---|---|---|
| चालू काम | ... | १ कोटीचे वर |
| चालू हप्त्यांचें उत्पन्न | ... | २,३१,१७६ रु. चे वर |
| खर्चाचें प्रमाण | ... | १४·९ टक्के |
| आयुर्विमा निधि | ... | ४ लाखाचे वर |

कंपनीच्या सोलापूर वसाहतीचे बांधकामास लवकरच सुरुवात होणार आहे.
:काम लवकर संपविणेसाठीं:
मुदतीच्या ठेवी घेणें आहेत.
मुदत व व्याजाचा दर याची माहिती कंपनीचे ऑफिसकडे मिळूं शकेल.
टी. डी. देशपांडे, बी. ए., एलएल. बी. सेक्रेटरी.
हेड ऑफिस : ८६६ सदाशिव पेठ, पुणें २.
व. न. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी. मॅनेजर.

## जलमार्ग व वहातूक

### (३)

### टेनेसी व भीमा नदी

अमेरिकेंतील लोक या प्रकारच्या जलमार्गावरील वहातुकीस किती महत्त्व देतात याची थोडीशी माहिती दिल्यास ती अप्रस्तुत होणार नाहीं. पाण्यावरील वहातुकीचा विचार मनांत आला कीं पनामासारख्या दोन देश जोडणाऱ्या भूगर्भावर कृत्रिम कालवा तयार केल्याचें आश्चर्य आपणांस पहावयास मिळतें. परंतु प्रत्यक्ष आपल्या इकडच्या नदीसारखी नदी घेऊन त्यावर कालव्याचें जाळें उभें केल्याचें दुसरें उदाहरण याच अमेरिकेंत आहे. टेनेसी ही ती नदी होय. ही नदी आपल्या इकडील भीमा नदीसारखीच उंचवट्यावर सुमारें ३००० फूट उंचीवर उगम पावली आहे. या भीमेच्या खोऱ्यांत डोंगर भागांत जशीं भाटघर, खडकवासलें, मुळशी वगैरे लहान मोठीं धरणें आहेत, तशींच टेनेसी नदीच्या खोऱ्यांत आहेत. त्यांची उंची व लांबी आणि पाण्याचा सांठा यांमध्येंही फारसा फरक नाहीं. पाऊसमान टेनेसी नदीच्या पार्श्वभागांत अवघें चाळीस ते पन्नास इंच आहे. भीमा नदीच्या पार्श्वभागांत मात्र तें पंचाहत्तर ते सवाशें इंच आहे. अमेरिकेंतील लोकांनीं मात्र टेनेसी नदीस बंधारे बांधून व कालवे काढून त्यांतून वहातूक करून व त्याच कालव्यांतून शेतीस पाणी देऊन टेनेसी खोऱ्यांत नंदनवन केलें आहे. आपण मात्र भीमा खोऱ्यांत दुष्काळ आहे, वहातुकीचीं साधनें नाहींत असें दृश्य पहात आहोंत. आपण जर हिंदुस्थान सरकारनें ज्याप्रमाणें दामोदर व्हॅली ॲथॉरिटी निर्माण केली तशी भीमा व्हॅली अथॉरिटी निर्माण करण्याचा सरकारपाशीं आग्रह धरला व टेनेसी नदीप्रमाणें बंधारे व कालवे काढले तर आपणासही त्याप्रकारची संपन्नता व वहातुकीचीं साधनें निर्माण करतां येतील व हजारों मैलांचा जलमार्ग उपलब्ध होईल. टेनेसी नदीच्या खोऱ्यांबाबत तेथील लोकांनीं एक समग्र माहिती देणारा ग्रंथ छापला आहे. त्यांत सर्व माहिती मिळण्याजोगी आहे. ज्या भीमा नदीची टेनेसी नदीसारखी सुधारणा करावी असें मी सांगत आहे, त्या भीमा नदीसंबंधीं थोडी जास्त व विस्तृत माहिती देणें आवश्यक आहे. भीमा नदीप्रमाणेंच महाराष्ट्रांतील गोदावरी, प्रवरा, कृष्णा आदिकरून नद्यांतून अवश्य ती सुधारणा केल्यास जलमार्गावरून सररहा हजारों मैलांची वहातूक करतां येण्याजोगी आहे. महाराष्ट्राचा भूपृष्ठ हा सर्वसाधारणपणें एकाच साच्याचा असल्यानें एका खोऱ्याचें वर्णन थोड्या-फार फरकांनीं दुसऱ्या खोऱ्यांनाही लागून पडणारें आहे. भीमा नदीची लांबी महाराष्ट्रांत सर्वांत जास्त असल्यानें व ही नदी बरेंच अंतर सपाटीवरून वहात असल्यानें या नदीचेंच उदाहरण घेतलें आहे.

भीमा नदी ही भीमाशंकर या सह्याद्रीचे शिखरावर समुद्र सपाटीपासून सुमारें साडेचार हजार फूट उंचीवर उगम पावली आहे व पुणें, सोलापूर, सातारा, अहमदनगर व विजापूर या जिल्ह्यांतून वहात जाऊन रायचूर येथें निजामहद्दींत कृष्णा नदीस मिळाली आहे. या नदीचे पात्राचा विचार केला तर दौंडपर्यंत या पात्रास पाणी नसतें, दौंडपासून रायचूरपर्यंत या नदीस पाणी सारखें वर्षभर असतें. या नदीचा उगम जरी साडेचार हजार फुटांवर असला तरी दौंडपर्यंत ही सुमारें २,८०० फूट खालीं उतरून सुमारें १,७०० फूट उंचीवरून वहात आहे. दौंडपासून पुढें मात्र या नदीस वर्षभर पाणी असतें व त्याचा प्रवाहही संथ आहे. या भागांत नदीच्या पात्राचा उतार दर मैलास अवघा चार फुटांचा आहे. दर तीन ते चार मैलांस सुमारें पंचवीस फुटांचा एक बंधारा घातल्यास व योग्य ठिकाणीं कालवे काढल्यास होड्यांनीं व पडावांनीं फार मोठी वहातूक या पाण्यांतून होऊं शकेल व पंढरपूरसारख्या क्षेत्राचे ठिकाणीं होड्यांतून जातां येईल. महाराष्ट्रांतील नद्यांच्या कालव्यांची सध्यांची लांबी पुढीलप्रमाणें आहे. नीरानदी दोनशें मैल, मुळामुठा अकरा मैल, प्रवरा ऐंशी मैल, गोदावरी एकशेंबारा मैल. या कालव्यांची वाढ होण्याजोगी आहे, या कालव्यावर प्रामुख्यानें गुळाचें पीक असल्यानें गुळाची वहातूक यांतून होण्याजोगी आहे. त्याचप्रमाणें उसाचे पिकास लागणाऱ्या हजारों टन पेंडीची वहातूकही या मार्गानें होण्याजोगी आहे. या गोष्टी तावडतोब कालव्यांतून कोणतीही सुधारणा न होतां होण्याजोग्या आहेत किंवा नाहींत हें आजच नक्की सांगतां येणार नाहीं. परंतु थोडीशी सुधारणा केल्यास या गोष्टी खात्रीनें शक्य आहेत व ही वहातूक होण्यास कालव्यांची वहातुकीच्या सोईनें पुनर्रचना सरकारनें अवश्य करावी. नवीन कालवे करतांना तर ही गोष्ट प्रामुख्यानें नजरेपुढें ठेवावी म्हणजे पाण्यावर उत्पन्न होणारें पीक कमी खर्चांत गिऱ्हाइकाकडे पोहोंचवितां येईल. महाराष्ट्रांत ज्या भागांत सपाटी आहे त्या भागांत कालव्यांतील वहातूक ही जपान हॉलंड या देशांतील कालव्यांच्या वहातुकीइतकी सुलभ झाली पाहिजे. कारखान्यांतून स्वतःच्या होडींत माल भरून ती होडी रेल्वे स्टेशनवरील प्लॅटफॉर्मवर लावण्याची शक्यता ज्या ज्या स्टेशनापासून कालवा अगर नदी जाते तेथें शक्य झाली पाहिजे. आपण सर्वांनीं जलमार्गावरील वहातूक सरकारकडून इतकी सुलभ करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे व सरकारास जरूर असेल तेथें सहाय्यही केलें पाहिजे. (संपूर्ण)

---

### अन्नधान्य परिस्थितीचा सरकारी आढावा

अन्नधान्याची सध्या किंमत आणखी वाढत चालली आहे. ती खरीप पिकें हातीं आल्यावर उतरावयास पाहिजे. परंतु खरीप पिकें फारशी समाधानकारक नाहींत. तांदुळाच्या आयातींत थोडी घट झाली आहे, परंतु इतर धान्यांची आयात ती भरून काढील. प्रांतिक सरकारें गरीब जनतेचे हाल होऊं नयेत म्हणून प्रयत्न करीत आहेत. तथापि, त्यांचेजवळ धान्य फारसें नाहीं आणि मध्यवर्ती सरकारजवळहि मोठा साठा नाहीं. मुंबई प्रांतापुरतें पाहिलें, तर पावसाळयास उशीर झाल्यामुळें पेरणीस विलंब लागला आणि पाऊस कमी पडल्यामुळें कांहीं पिकें खराब झालीं. बाजारांत धान्य पुरेसें येत नाहीं. स्वस्त धान्याचीं २,९८५ दुकानें चालू आहेत. त्यांनीं धान्याच्या किंमत वाढीस थोडा-फार आळा घातला आहे. तथापि, त्यांतून दिल्या जाणाऱ्या धान्याचें प्रमाण कायम राखणें प्रांतिक सरकारास कठीण जाईल, असें दिसतें.

---

### डॉलरच्या बचतीसाठी अमेरिकन चित्रपटांस बंदी

ग्रेट ब्रिटनमध्यें १९४६ सालीं एकूण जेवढे चित्रपट दाखविण्यांत आले, त्यांत अमेरिकन चित्रपटांचें प्रमाण १८% होतें. १९४७ सालीं तें वाढून २०% झालें. अमेरिकन चित्रपटांसाठी ग्रेट ब्रिटनला दुर्मीळ डॉलर द्यावे लागतात. त्यांची बचत करण्यासाठी, ग्रेट ब्रिटनमध्यें इापुढे दाखविण्यांत येणाऱ्या चित्रपटांपैकीं किमान ४५% चित्रपट तरी ब्रिटिशच असले पाहिजेत, अशी सक्ती करण्यांत आली आहे.

## "वाढत्या लोकसंख्येस अन्न पुरणार नाहीं."

('अमेरिकन असोसिएशन फॉर दि अडव्हान्समेंट ऑफ सायन्स' च्या शतसांवत्सरिक समारंभांत शास्त्रज्ञांनीं दिलेला गंभीर इषारा)

अन्न, वस्त्र व निवाऱ्याची जागा ह्या मनुष्यप्राण्याच्या प्राथमिक गरजा भागविण्यासाठीं नैसर्गिक साधनांचाच उपयोग होतो. सध्या ज्या प्रमाणांत हीं साधनें उपयोगांत आणलीं जातात, त्या प्रमाणांत त्यांचें उत्पादन होत नाहीं. आज ज्या गतीनें लोकसंख्या वाढत आहे ती गती कायम राहिली तर पृथ्वीची लोकसंख्या ७० वर्षांत आजच्या दुप्पट होईल. २१ व्या शतकाचे प्रारंभीं पृथ्वीची लोकसंख्या ३०१ कोटी भरेल. जगांत पिकें काढण्याजोगी जमीन ४०० अब्ज एकर आहे. प्रत्येकास पुरेसें किमान अन्न पुरविण्यास माणशीं २½ एकर जमीन हवी; परंतु आज २ एकरहि वांट्यास येत नाहींत आणि लोकसंख्या वाढत चालली म्हणजे तो वाटा आणखी कमीच होईल. कांहीं देशांत दर माणशीं १ एकरहि जमीन वांट्यास येत नाहीं. तेव्हां उपासमार न होईल तरच आश्चर्य! पृथ्वीची उत्पादनक्षमता टिकवली आणि लोकसंख्या मर्यादेंत राहिली तरच मानव जातीचें भवितव्य उज्वल आहे. परंतु आज ह्या गोष्टींकडे दुर्लक्ष केलें जात आहे. उत्पादनवाढीचीं फळें कांहीं थोड्या नशीबवान लोकांनाच चाखण्यास मिळणार असतील तर तीव्र उपाययोजना अपरिहार्यच होईल. माणसांचें मनुष्यत्व विकास पावणें हाच ह्या परिस्थितीवरील प्रभावी तोडगा आहे.

---

## स्वदेशी इलेक्ट्रिक मोटार्स तयार होऊं लागल्या

### किर्लोस्कर इलेक्ट्रिक कं. लि. ची प्रगति

ऑगस्ट, १९४७ मध्यें कंपनीला म्हैसूर सरकारकडून बंगलोरच्या औद्योगिक वसाहतींत २० एकर जागा मिळाली. तिचेवर इमारतीचें बांधकाम तात्काळ सुरू करण्यांत आलें आणि आतां ती तयार झाली आहे. इलेक्ट्रिक मोटर्सच्या उत्पादनास आवश्यक ती यंत्रसामुग्री, कच्चा माल, इ. येऊन दाखल झाला आहे आणि कारखान्यांत आतां उत्पादनास प्रारंभ झाला असून चार महिन्यांचे आंत त्यास गति प्राप्त होईल अशी अपेक्षा आहे. हिंदुस्थान सरकारचे उद्योगमंत्री डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी व म्हैसूर सरकारचे उद्योगमंत्री श्री. दासप्पा ह्यांनीं कारखान्यास नुकतीच भेट दिली. दोन्ही सरकारांचें कंपनीच्या कार्याकडे सहानुभूतिपर लक्ष आहे. अहवालाचे वर्षांत उत्पादनास प्रारंभ झाला नाहीं, ह्यासाठीं मॅनेजिंग एजंटांनीं (किर्लोस्कर सन्स आणि कं.) ऑफिस अलावन्स घेतला नाहीं. त्याचप्रमाणें जनरल मॅनेजरांनीं ३० जून, १९४८ पर्यंतचा मासिक पगार घेतला नाहीं. ह्या दोन्ही गोष्टींचा डायरेक्टरांना आपल्या रिपोर्टांत कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे. कारखान्याच्या इमारतीचें व त्यांत ऑगस्ट १९४८ मध्यें तयार केलेल्या पहिल्या इलेक्ट्रिक मोटारीचें छायाचित्र अहवालांत देण्यांत आलें आहे. कंपनीनें विक्रीस काढलेलें २५ लक्ष रुपयांचें सर्व भांडवल खपलेलें आहे.

---

### महागाईमुळें धूम्रपान बंद

ग्रेट ब्रिटनचे माजी अर्थ मंत्री व सध्याचे चॅन्सेलर ऑफ दि डची ऑफ लँकेस्टर, मि. ह्यू डाल्टन, ह्यांनीं धूम्रपान सोडून दिलें आहे. महागाई हें त्यास त्यांनीं कारण दिलें आहे. त्यांना मंत्री ह्या नात्यानें सुमारें ५ हजार रु. पगार मिळतो.












**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
★ दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी ★
९६ नारायण पेठ, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व प्र. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनी 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.